जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०२/२०२४
## दि.०८/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ५२/२०२४,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म अॅक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | दिनेश भांदुर्गे, पोलीस अंमलदार, मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **आरोपीत** | १.हर्षवर्धन ऊर्फ लकी मोहन रेड्डी,वय-१९ २.कुलदीप ऊर्फ कुणाल संजय साळुंखे,वय-१९, ३. तेजस ऊर्फ सन्नी अश्विन पिल्ले,वय-२०,सर्व रा.केशवनगर,पुणे ४.शशांक श्रीकांत नागवेकर, वय-२० वर्षे,रा.सुशिल सिध्दी सोसायटी,हनुमाननगर,केशवनगर,मुंढवा,पुणे (अटक) व इतर तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/४० वा.झेड कॉर्नर येथील लोणकर पेट्रोल पंपाचे मागील बाजुस कच्च्या रस्त्यालगत अंधारात मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे लोखंडी रॉड, लोखंडी पोकळ पाईप,दोन लोखंडी धारधार हत्यार इत्यादी घातक शस्त्रे तसेच मिरची पुड व नायलॉन रस्सी असा एकुण ६००/- रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,झेड कॉर्नर येथिल लोणकर पेट्रोल पंपावर जमा झालेली रक्कम स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकुन लुटण्याचे तयारीत असताना आ.क्र.१ ते ४ मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जोरे ९४०३५४७५०१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे १२५/२०२४,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेअॅक्ट १८५,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सोमनाथ काटे,वय-५३ वर्ष,रा.पाडुरंग व्हिला,पिंपळे-सौदागर,पुणे |
| **आरोपीत** | टिपरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०२/२०२४ रोजी ११/३० वा.गंगा व्हिलेज सोसायटी जवळ,चितामणीनगर,हांडेवाडी रोड,हडसपर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मावस भावाचा मुलगा मेघांत शेवाळे,वय-२४,वर्षे,रा.मेघांत बंगला,इंद्रप्रस्थ सोसायटी,मांजरी फाटा,हडपसर,पुणे हा नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टिपर वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार मेघांत शेवाळे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धनाजी टोणे ०२०/२६८२४९८१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे २१/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-७० वर्षे,रा.कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०२/२०२४ रोजी १५/४५ ते १६/१५ वा.चे दरम्यान ॲम्प्लफॉन हॉस्पीटल ढोले-पाटील रोड,रुबी हॉस्पीटल समोर बंडगार्डन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचेकडील चालकाने त्यांचेकडील कार ही नमुद ठिकाणी सार्वजनिक रस्त्यावर पार्क केलेली असताना,कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे कारचे डाव्या बाजुचे मागील दरवाजा कशाचेतरी सहायाने उघडुन,कार मध्ये असलेल्या सुटकेस मधील १,५०,०००/- रूपये रोख रक्कम सुटकेससह चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस उप-निरीक्षक, उपलप ०२०/२६१५२२२२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ६५/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५७ वर्षे,रा.धायरी गांव,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०२/२०२४ रोजी १३/०० ते १४/०० वा.चे दरम्यान धायरी ते दांडेकर पुल ते वाकडेवाडी बस स्टॉप खडकी पुणे पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने धायरी ते दांडेकर पुल ते वाकडेवाडी बस स्टॉप खडकी असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे बॅगेची चेन उघडुन,बॅगे मधील १५,०००/- रूपये रोख व सोन्याचे मंगळसुत्र असा एकुण ३,१५,०००/- रू किचा ऐवज बॅगे मधुन काढुन चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, कल्याणी पांडोळे ९७६३२९२०३४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ६३/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-७५ वर्षे,रा.लक्ष्मी व्हीला,चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०२/२०२४ रोजी १५/१० वा.ते १७/०० वा.चे दरम्यान गणपती माथा ते वाघोली,पुणे पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान चंदननगर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने गणपती माथा ते वाघोली,पुणे असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील ७०,०००/- रुपये किचे सोन्याचे मिनी गंठण चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, जोगदंडे ९९२३३५३०६८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**